# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

**विषय :– फेब्रुवारी–मार्च २०२३ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२३ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी–मार्च २०२३ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर शुक्रवार दिनांक २७/०१/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून college login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. फेब्रुवारी–मार्च २०२३ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा/प्राचार्यांचा शिक्का मारून स्वाक्षरी करावी.

३. प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket) विषय व माध्यम बदल असतील तर त्यांच्या दुरुस्त्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात जाऊन करुन घ्यावयाच्या आहेत.

४. प्रवेशपत्रावरील (Hall Ticket) फोटो, स्वाक्षरी, विद्यार्थ्याचे नाव या संदर्भातील दुरुस्त्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करुन त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरीत पाठवावयाची आहे.

५. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

६. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

तरी फेब्रुवारी–मार्च २०२३ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक : २५/०१/२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.



क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/3030
दिनांक:-25/01/2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/कोल्हापूर.

**विषय:- फेब्रुवारी-मार्च 2023 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत** (Hall Ticket)..

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी) फेब्रुवारी-मार्च 2023 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांबाबत सोबत जोडलेल्या प्रकटनानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच No Candidate केलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे संबंधित विद्यार्थ्यांना वितरीत करु नयेत. ज्या विद्यार्थ्यांनी विशेष अतिविलंबाने परीक्षेचे आवेदनपत्र मंडळास सादर केलेली आहेत. परंतु त्या विद्यार्थ्यांची ग्रेड लिस्ट मध्ये बैठक क्रमांकाची छापील नोंद नसेल तर अशा विद्यार्थ्यांची माहिती मंडळास सादर करताना कॉलेजच्या लेटरहेडवरती विषय, बैठक क्रमांक, श्रेणी अशी नोंद करुन त्या पत्रावरती प्राचार्य व विषय शिक्षक यांची स्वाक्षरी घेऊन सदर पत्र ग्रेड लिस्टच्या पाकिटामध्येच घालावयाचे आहे.

**(डी.एस.पोवार)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहितीस्तव -**

1) **मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर**
2) **शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.सातारा / सांगली / कोल्हापूर**

Panwalkar/Circular

# प्रवेशपत्रिकेतील / कनिष्ठ महाविद्यालय यादीतील चुकांच्या दुरूस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

To be Submitted Before Examination

प्रपत्र परीक्षेपूर्वी दोन दिवसांपर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

क. महाविद्यालयाचा क्रमांक :- | J | | | | | | | |

**HSC Examination of Feb.-March /Sept.-Oct. ______**

Proforma Indicating Errors in the Seat No. Wise College List of Candidates

| **Sr.No.** अ.क्र. | **Application No.** आवेदनपत्र क्र. | **Seat No.** बैठक क्रमांक | **Name of Candidate** विद्यार्थ्यांचे नाव | **Orignal/Incorrect Position in the College List/Hall Ticket** कनिष्ठ महाविद्यालय यादीतील/ प्रवेशपत्रिकावरील नोंद | **Correct Position as per the College Record** क.महाविद्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे आवश्यक दुरूस्ती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.)

प्राचार्य

स्थळ -

दिनांक-